# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट क्रमांक - ३५७/२०२४ दिनांक २८/०९/२०२४

## प्रेस नोट

### " झुम ॲपवरुन गाडी भाड्याने घेवुन भाड्याने घेतलेल्या गाड्यांची विक्री करणा-या महाठगाला अटक करण्यात काशिगाव पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाला यश."

दि.२५.०९.२०२४ रोजी तक्रारदार नामे **जॉन सुभसिंग कागडा**, वय ३२ वर्षे, व्यवसाय- नोकरी, पत्ता- रुमनंबर ४०१, जय जिवदानी निवास, रेतीवाडी, आचोळे, नालासोपारा पुर्वे, पालघर व तक्रारदार नामे **ज्ञानेश्वर बाबुराव चव्हाण,** वय- ३२ वर्ष, व्यवसाय- शेती, रा. मु. पो. भाटीपुरी तांडा, ता.जि. जालना यांना त्यांच्या करीता **सेकंड हॅन्ड कार विकत घ्यायची** असल्याने त्यांना मिरारोड येथील इस्टेट एंजट नामे **मुस्ताफा राशिद खान** यांचा नंबर मिळाला त्यांनी त्यास संपर्क केला असता मुस्ताफा याने त्यांच्या मोबाईलमधुन विक्री करीता असलेल्या वेगवेगळ्या गाड्यांचे फोटो तक्रारदार यांना सेंड केले यांतील व्हाईट कलरची मारुती कंपनीची आर्टीगा कार क्रमांक एम.एच.०१ डी.एक्स १७८६ ही तक्रारदार यांना पसंद पडल्याने त्यांच्यात झालेल्या बोलणी प्रमाणे त्यांनी सदर कार घेण्याकरीता त्यांना दिनांक ०३.०९.२०२४ रोजी काशिमिरा नाका येथे बोलविले व त्यांच्याकडुन २,००,०००/रु घेवुन त्यांना दोन दिवसात उर्वेरीत चार लाख रुपये दिल्यावर गाडी नांवावर करुण देतो असे सांगून निघून गेला त्यानंतर त्याच मारुती कंपनीची आर्टीगा कारचा व्यवहार जालना येथुन आलेले इसम नामे **ज्ञानेश्वर बाबुराव चव्हाण** यांच्या सोबत सहा लाख रुपयात केला व त्यांच्याकडून ४,००,०००/रुपये रक्कम घेवून त्यांना गाडीचा ताबा घेण्या करीता दिनांक ४.०९.२०२४ रोजी काशिमिरा नाका येथे बोलविले तक्रारदार बाकीचे पैसे घेवून काशिमिरा नाका येथे आले असता त्यांनी गाडी वॉश करुण व बॅंकेची प्रोसेस पुर्ण करुण येतो  तुम्ही येथे थांबा असे बोलून सदर ठिकणाहून तो गाडी घेवून पळून गेला तक्रारदार यांनी त्याला संपर्क केला असता त्याचा मोबाईल फोन बंद आला त्यावेळी त्यांची फसवणूक झाली असल्याचे त्यांच्या लक्षात आले त्यांच्या झालेल्या फसवणूकी वरुन काशिगाव पोलीस स्टेशन गु.र.नं I ३११/२०२४, भा.न्या.सं कलम ३१८(४), ३१६(२) प्रमाणे त्याच्या विरुद्ध दिनांक २६.०९.२०२४ रोजी गुन्हा दाखल केला आहे.

नमुद गुन्ह्याच्या तपासात मारुती कंपनीची आर्टीगा कार तीचा क्रमांक एम.एच.०१ डी.एक्स १७८६ यांच्या **मुळ मालकाशी संपर्क केला असता त्यांनी सदर कार मुस्ताफा खान यांस झुम ॲपव्दारे दोन दिवसा करीता भाड्याने दिली असल्याचे सांगितले.**

इसम नामे मुस्ताफा राशिद खान याने फसवणूकीच्या उद्देशाने गाडी ऑनलाईन झुम ॲपव्दारे भाड्याने घेवन तिची विक्री केली असल्याने त्याचा शोध घेवून त्याला अटक करण्याच्या सुचना मा.वरिष्टांनी दिल्या होत्या वरिष्ठ पोलीस अधिकारी यांच्या सुचना व मार्गदर्शना प्रमाणे इसम नामे **मुस्ताफा राशिद खान वय ३२ वर्षे रा. व्यापार कार ट्रेडींग, रा. रुम नं.४/बी२०५ सनटेक वेस्ट वर्ड, तीवरी रोड, नायगाव , पालघर यांस** ताब्यात घेवुन त्याला नमुद गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. अटक आरोपीताने या व्यतिरिक्त आणखीन किती लोकांची फसवणूक केली आहे याबाबतचा

तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली नमुद गुन्ह्याचे तपासी अधिकारी पोउपनिरी अभिजीत लांडे हे करत आहे.

अटक आरोपी नामे **मुस्ताफा राशिद खान** हा फसवणूकीचे गुन्हे करण्यात सराईत असून त्याच्या विरुद्ध खालील प्रमाणे फसवणूकीचे गुन्हे दाखल आहे.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि.नं. |
|---|---|---|
| १ | नयानगर पोलीस स्टेशन | ५७९/२०१८ भादविस कलम ४२०,४०६४६८,४७१ प्रमाणे |
| २ | कासारवडवील पोलीस स्टेशन | २८५/२०२१ भादविस कलम ४२०.४०६,३४ प्रमाणे. |
| ३ | काशिमिरा पोलीस स्टेशन | ११४/२०१९ भादविस कलम ४२०,४०६,१२०बी प्रमाणे |
| ४ | काशिमिरा पोलीस स्टेशन | २२३/२०१९ भादविस कलम ४२०.४०६ प्रमाणे. |

तरी सदर प्रेस नोट अन्वये मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तलया तर्फे नागरिकांना आव्हाण करण्यात येते की, आपल्या नांवावर असलेली चारचाकी दुचाकी गाड्या इतर कोणाला देतांना किंवा ऑनलाईन ॲपवर टाकतांना खबरदारी बाळगावी गेल्या अनेक दिवसांपासुन सातत्याने गाड्यांची खरेदी विक्री तसेच गाड्या गहाण ठेवुन त्यांची परस्पर विक्री करणे इत्यादी तक्रारी मोठ्या प्रमाणात वाढल्या असुन सदर व्यवहार कायदेशीर बाबींची पुर्तता करुणच केला पाहीजे असे सुचित करण्यात येत आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०१, डॉ विजय मराठे, सहाय्यक पोलीस आयुक्त, मिरा रोड विभाग, राहुलकुमार पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, काशिगाव पोलीस स्टेशन यांच्या मार्गदर्शनाखाली काशिगाव पोलीस स्टेशनचे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी/अंमलदार यांनी केली आहे.

-----ooo-----